ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-III October 2012

# किनवट तालुक्यातील बंजारा समुदायाच्या धार्मिक पैलुचे समाजशास्त्रीय अभ्यास

**दशरथ जाधव,**

**सहाय्यक प्राध्यापक,**

**समाजशास्त्र विभाग,**

**एस. एन. डी.टी. महिला विद्यापीठ,**

**मुंबई.**

***सारांश :***

*किनवट तालुका नांदेड जिल्ह्यात असुन महाराष्ट्र शासनानी डोंगरी आणि आदिवासी तालुका म्हणून घोषित केलेले आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील मागासलेला एकमेव असा तालुका आहे. प्राचीन काळापासून बंजारा समुदायाचे अस्तित्व किनवट तालुक्यात आहे. बंजारा समुदायाचे धार्मिक जीवन, कर्मकांड, पुजा पध्दती, विविध सणात धार्मिकता, विवाह विधीत धार्मिकता इ. बाबतीत या संशोधनात परामर्श घेण्यात आलेला आहे. बकरा बळी देऊन देवाला प्रसन्न करण्याची परंपरा या समुदायात प्राचीन काळापासून आजपर्यंत आबाधित आहे. होळीत गेर म्हणून बकरा बळी देणे, समनक म्हणून बकरा किंवा शेळी कापणे, आईची पूजा म्हणून बकरी कापणे इ. बाबतीत बंजारा समुदायाची धार्मिकता इतर समुदायापेक्षा वेगळी आहे. हेच या संशोधनातून स्पष्ट करण्याचा अल्पसा प्रयत्न.*

*बंजारा समुदायाची धार्मिक कल्पना अजुन ही पारंपारीकच असुन पूर्वजांच्या आत्मशांती करीता हा समुदाय सतत प्रयत्नशील असल्याचे दिसते.*

**मुख्य संज्ञा : बंजारा समुदायातील अंधश्रध्दा**

**प्रास्ताविक –**

बंजारा समुदायाला गोरमाटी, गोर, लमान, लभान, लमाणी इ. नावाने ओळखले जाते. पण 'गोरमाटी संस्कृति आणि संकेत' या पुस्तकात श्री मोहन नाईक यांनी बंजारा पेक्षा गोरमाटी हे नाव सत्य आहे असे म्हणतात. गोरमाटी हा शब्द पशुपालक या अर्थाने रूढ झाला. गोरवट समुहाच्या प्रचलीत मान्यतेनुसार गणगोर ही गोरगणांची प्रमुख देवता मानली जाते. गौरी आणि शिवापासून उत्पन्न झालेला गण म्हणजे गोरगण किंवा गौरीपासून उत्पन्न झालेला माणुस गोरमाटी हा अर्थ सर्वात जास्त सोयीस्कर वाटतो. गायी गुरांची खिल्लारे बाळगणारे लोक गोरमाटी बंजारा समुदायाची काही उपजाती

सुध्दा असून त्यात ढालिया जांगड, ढाडी, भाट, सोनार, बंजारा, न्हावी सिंगाडे आणि लभाण यांचा समावेश होतो. पण लभाणांची जीवन पध्दती बंजारा पेक्षा भिन्न आहे. बंजारा समुदायात स्तरी करणाची व्यवस्था असल्याचे डॉ. यशवंत जाधव यांनी 'बंजारा जाती समाज और संस्कृति' या पुस्तकात म्हटले आहे. त्यात बंजारा पहिल्या वर्गात असून उपजाती दुसऱ्या वर्गात आहे. आणि तिसऱ्या वर्गात मथुरिया, ओसरिया, भारव, मुकेरी, मुलतानी, या उपजातींचा समावेश होतो. या तीन्ही वर्गात बेटी व्यवहार केले जात नाही. त्यांचे कुळ, गोत्र, आडनांव वेशभुषा यामध्ये फरक आहे.

बंजारा समुदायात कुलदैवताना पुजनाची प्रथा असून सणाला चूलीत तुप आणि शिधा आहुती म्हणून भोग लावले जाते. घरातील सर्व मंडळी चूलीपूढे नतमस्तक होतात.

बंजारा समुदायाचा प्रमुख व्यवसाय लदेणी करणे होता. बैलाच्या पाठीवर मीठ वाहून नेणे याला लदेणी म्हणत. या समुदायात एक क्रांतीकारी महापुरूष होऊन गेले. त्यांनी या समुदायाला संजीवनी दिली. रांजले गांजल्यांना आधार दिले. अंधश्रध्दाला मुठमाती देण्याची प्रवचने देऊन या समुदायाला प्रकाशात आणण्याचे मोलाचे कार्य करणारे संत सेवालाल महाराज या सेवालाल महाराजांना सेवाभाया म्हणत. सेवा भाया म्हणजे भाऊ. मला सर्वच जण भाया म्हणतात. म्हणजे मी सर्वांचा भाऊ आहे. माझा जोडीदार या पृथ्वीवर नाही म्हणून त्यांनी अजन्म ब्रम्हचारी राहण्याचे व्रत घेतले आणि संत सेवालाल महाराज अजन्म अविवाहीत राहीले. संत सेवाभायाचा काळ दक्षिण भारतातील निजाम राजवटीचा काळ होता. पारंपारिक व्यवसाय बंद पडले. एका ठिकाणी राहून पोट भरणे शक्य नव्हते. कारण तसे साधन उपलब्ध नव्हते. त्यामुळे तांडे अस्थिर झाले. अज्ञान, दारिद्रय, शिक्षण तर नाहीच, इतर समाजापासून चार हात दूर राहणे, पुढे गुन्हेगार जमाती कायद्यामुळे होत असलेला छळ अशा परिस्थितीमध्ये हा समाज दैववादी बनला. मग अंधश्रध्दा रूढी, परंपरेचा लाभ देवीचे भक्त बकरा, कोंबडी बळी देणे, गंडा दोरी, जादूटोणा करून भगत यांना लुबाडात होते. तर दुसऱ्याकडे तांडयाचे नाईक पण नाईकी गाजवून गोरगरिबांना छळत होते. अशा सामाजिक आर्थिक परिस्थितीत गांजलेल्या नडलेल्या बंजारा जमातीत सेवाभायाचा जन्म झाला. अशा अंधश्रध्दातून संत सेवाभायानी धार्मिक विचारांनी या समाजाला प्रकाशयुगाकडे नेण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही प्रकारची परंपरा नसताना संत सेवाभायानी मायेच्या मागणसुकीच्या नात्यांनी या समाजाला जागे केले. दुहेरी मार्गाने सामजाला त्यांनी सुधारण्याचे प्रयत्न केले. संत सेवाभाया एका वचनात म्हणतात माझ्या गोर बांधववार संकट आले तर त्यांच्या संरक्षणासाठी ''काठीची मी तलवार करीन, दगडाचा बॉम्ब करीन.'' बळी देण्यापेक्षा देवाला भोग देण्याचा पर्याय त्यांनी भक्तांना दिला. गव्हाचे पीठ, गुळ आणि तूपाचा शिरा करा. आहुतिभोग दया, आणि तो प्रसाद (कढाव) सर्वांना वाटा, आजही सेवाभायाची पूजा भोग देवून केली जाते.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

1. बंजारा समुदायातील धार्मिकतेची वेगळी अशी ओळख करून घेणे.
2. किनवट तालुक्यातील बंजारा समुदायाच्या वैवीध्यपुर्ण अशा सांस्कृतिक जीवनाची माहिती घेणे.

**तथ्य विश्लेषण :**

किनवट तालुक्यातील बंजारा समुदायाच्या धार्मिक पैलुचा अभ्यास करताना भिन्न भिन्न निष्कर्ष प्राप्त झालेले असुन ते खालीलप्रमाणे आहेत.

1. पोळा हा सण बंजारा समुदायात तेवढयाच उत्साहाने साजरे केले जाते. या सणात त्यांचे दैवत म्हणजे बैलाला पुजले जाते. नांगर किंवा वखराचे 'जू' पलंगावर ठेवून त्यांला पांढऱ्या कोऱ्या धोतराखाली ठेवतात आणि जी बैल जोडी घरासमोर येईल त्याला नैवद्य देऊन त्या बैलाची पुजा केली जाते.
2. दिवाळीच्या दिवशी शेणाची विशिष्ट आकृती तयार करून त्याची पुजा केली जाते या क्रियेला गाई गोदन असे म्हणतात. यात सर्व मुली सहभागी असतात.
3. विजयादशमी (दसरा) ला घरातील सर्व लोखंडी अवजरांना धुऊन पुजा केली जाते. संध्याकाळी एकमेकांच्या घरी जाऊन दर्शन घेतल्या जाते.
4. बंजारा समुदायाच्या मान्यतेनुसार आत्मा अविनाशी असून शरीर नाशवंत आहे. आत्म्याच्या नावाने विशेषतः मृत पूर्वजांच्या नावाने प्राण्यांचा बळी देऊन त्याना संतुष्ट केल्यास मृत पुर्वज प्रसन्न होऊन सुख समृध्दी देतात. अशी मान्यता आहे. या जीव बळीस गोट म्हणतात.
5. बंजारा समुदायात हनुमानाची पुजा कडाव चुरमो, खीर इ. पदार्थाचा भोग देऊन केली जाते. भोगासाठी लागणारे आहाराचे पदार्थ चरित अग्नी पेटवून त्यावर शिजविले जाते.
6. बंजारा समुदायात पूर्व दिशेला अधिक महत्व असून बंजारा लोकांचे घराचे दरवाजे पुर्वेलाच असल्याचे दिसते.
7. पावसासाठी साकडे घालावयाच्या विधीस 'साळसुखे' म्हणतात. या दिवशी तांडयातील किशोरवयीन मुले एकत्र जमुन समुहातील मुलांना नग्न करून कडुनिंबाच्या डहाळीचे वल्कले नेसतात. एका मुसळाच्या मधोमध एक जीवंत बेडुंक बांधून त्यास लिबांच्या पानाने झाकतात आणि मारूतीवर पाणी टाकतात आणि एकत्र भोजन करतात त्याला 'भतकोला' म्हणतात.
8. बंजारा समुदायाच्या धार्मिक मान्यतेनुसार सामंत पुजा ही कुलदैवत व मृत पुर्वजांना प्रसन्न करण्यासाठी केली जाते. या पुजेत कुलदैवत व पूर्वज याना मांसाहाराचा नैवद्य दिला जातो. मासाहार प्रमुख्याने बकरा कापून केला जातो.

9. बंजारा समुदायात सतीची पूजा करून जावळ काढण्याची पध्दत आहे. सती पूजेत शुक्रवार दिवस आणि चांदणो शुल्कपक्ष असावा लागतो. जावळ काढण्यास मुलांची जोडी असणे महत्वाचे मानतात. जोडी नसल्यास मुलाचे प्रतिक म्हणून जोडीला नारळ ठेऊनही जावळ संस्कार करता येतो.
10. बंजारा समुदाय हा जादूटोणा, भुत–पिशाच्छ यांना मानणारा आहे. आत्म्यावरील विश्वास भुत–पिशाच्छ यांची भिती या कारणांमुळे संकटे मोठया प्रमाणावर येतील असे गृहीत धरून त्या संकटापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी जावळाचे केस काढले जाते.
11. बंजारा लोकांत मृतांना अग्नी संस्कार दिले जाते. मृतांचे डोके तांडयाकडे, पाय स्मशानाकडे असलेल्या स्थितीत तीरडी खांद्यावर घेऊन चालू लागतात. नियोजित ठिकाणी अधिच अग्यारिची रचना करण्यास निवडक माणसे गेलेली असतात. अग्यारीची रचना उत्तर दक्षिण असते. मृताचे पाय दक्षिणेकडे, डोके उत्तरेकडे अशा स्थितीत प्रेतास अग्यारीवर ठेवतात. प्रथम मृताचा मोठा मुलगा अग्नी देतो. चिता थोडी पेटल्यावर निबांच्या पानाची एका डहाळीने प्रेताच्या डोक्यास 7 वेळा स्पर्श करतात यास 'कुचो' म्हणतात.
12. बंजारा समुदायात कुमाराला अग्नी देत नाही, लग्न झालेल्यास अग्नी दिल्याशिवाय चालत नाही. सहचरिणी (पत्नी) नसणाऱ्या अविवाहीत कुमाराच्या मृतदेहाची दफन विधी केले जाते. या लोकात मृत्यूच्या तिसऱ्या दिवशी दाडो (दन) श्राध्द करतात. पुन्हा नातलग रानात जमतात. येथेच चुरमो नावाचे श्राध्द करतात. गुळ व गव्हाच्या पोळया कुस्करून केलेला पदार्थ म्हणजे चूरमो होय. इकडे चिता सावडायला दोन व्यक्ति गेलेल्या असतात. याला गोरबोलीत सारोबारो म्हणतात. बाराव्या दिवशी बारमो करतात. अंगणासमोर रात्री विधवा स्त्रियांकडून तांदूळ शिजवून (कच्चा–पक्का) घेतात. याला 'काचापाको' म्हणतात. तेराव्या दिवशी तेरवी करतात. त्याला 'तेरमो' म्हणतात. यात गोडधोड पदार्थ करून मृताला धबकार नैवद्य देतात. मृत व्यक्तिच्या कुटूंबियाना मासाहार देण्याची प्रथा या लोकात असून जवळचे नातलग आपल्या पैशानी बकरा विकत घेऊन कापतात व त्या मृत पावलेल्यांच्या कुटूंबियाना मटनाचे जेवण देतात ही प्रथा आजही अस्तित्वात आहे.
13. या समुदायात भानामती, करणी, बाधा इ. अंधश्रध्दाचे अस्तित्व असल्याचे जाणवते. एखाद्या व्यक्तींचे किंवा लहान मुलांचे कपडे (फलोत्या) नखे, केस यापैकी काहीही मिळवून त्यावर मुंजा नावाच्या अलौकिक शक्तिचा वापर केला की, त्याचा त्रास त्या व्यक्तिस आपोआप होतो अशा त्रासाला 'करणी' (भानामती–बाधा) म्हणतात. त्यांच्या निराकरणाकरीता मांत्रीक, भगत व जुडीबुटीवर विश्वास ठेवतात.
14. हिन्दू पौराणिक मान्यतेनुसार मारूती हे शक्तीचे प्रतिक असून हनुमानाचे मंदीर जर गावाबाहेर असेल तर गावावर येणारे कोणतेही संकट हनूमान गावात येण्यापूर्वीच परतवून लावील अशी

पारंपारिक धारणा असल्याकारणाने हनुमानाचे मंदिर तांडयाबाहेर असते. बंजारा समुदायातील प्रत्येक तांडयात हनुमानाचे मंदिर असतातच.

15. मु.पो. पोहरादेवी (उमरी) ता. मानोरा, जि. वाशिय येथे सेवाभायाची समाधी असून तेथे बऱ्याच प्रमाणात बंजारे लोक बकरे बळी देतात. पोहरा उमरीस जवळपास सर्वच बंजारे लोक दर्शना करीता जातात.

16. बंजारा जमातीचा प्रमुख व्यवसाय शेती असून नांगरणी ते कुळपणीपर्यंत वेगवेगळया देवी देवतांची शेतात पुजा केली जाते. कापुस वेचताना सितादेवीची पूजा करूनच कापूस वेचतात. ज्वारी घरी आणण्यासाठी आधि ज्वारीची रास (ढिग) बनवून त्यासमोर बकरा बळी देण्याची प्रथा आहे. त्यामुळे देवता प्रसन्न होऊन वर्षभर अन्नधान्याची रेलचेल असते अशी समजूत आहे.

**सारांश :**

किनवट तालुक्यातील बंजारा समुदायाच्या धार्मिक पैलुचे अभ्यास करताना असे दिसून आले की, हा समुदाय अजून ही धार्मिक कर्मकाडांत अडकलेला असून पूर्वीपासून चालत आलेल्या प्रथा अजूनही कायम असल्याचे दिसून येते. या संशोधनाकरीता 300 प्रतिसादक निवडण्यात आले होते. त्यांच्याकडून मिळालेल्या माहिती नुसार निष्कर्ष काढण्यात आलेले आहे. या समुदायात शैक्षणिक प्रगती बऱ्याच प्रमाणात झालेली असून सूध्दा अंधश्रध्देचे अस्तित्व कायम असल्याचे जाणवते.

**संदर्भ सुची –**

1. श्री. मोहन नाईक – गोरमाटी संस्कृती आणि संकेत.
2. कै. बळीराम पाटील – गोर बंजारे लोकांचा इतिहास
3. डॉ. रूक्मिणी पवार – बंजारा लोकजीवन पध्दती
4. प्रा. मोतीराज राठोड – गोरबंजारा जनजाती एक परिचय
5. श्री. रणजीत नाईक – बुधन
6. देवगावकर एस.जी. – The Banjara
7. डॉ. यशवंत जाधव – बंजारा जाती, समाज और संस्कृति